अतितात्काळ

क्र.शिउसं/प्रावि-५/२००९-१०/ 2 4 4 4 5
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद
दिनांक:- 3 FEB 2010

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,जालना.

विषयः-खाजगी अनुदानित/विना अनुदानित प्राथमिक शाळांना सन २००७-०८ या वर्षी इयत्ता ५ वी प्रथम वर्ग व इयत्ता १ ली ते ७ वी च्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त तुकडया मंजूर करणेबाबत..

संदर्भः- १) शासन परिपत्रक क्रमांकः-प्राशातु-१४०७/(२६/०९/)/प्राशि-३ दिनांकः-०५/०८/२००९
२) शासन पत्र क्रमांकः-प्राशातु-११०९/(२६/०९)/प्राशि-३ दिनांकः-१३/०१/२०१०
३) संचालनालयाचे पत्र क्रमांकः-खाप्राशा/नै.तु.वाढ/२००९/ड-५१२-अ/१६२ दि.३०/१२/०९

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की संदर्भीय संदर्भ क्रमांक-१ च्या शासन परीपत्रकानुसार आपल्या जिल्हयातील खालील प्राथमिक शाळेस त्यांचे नावापुढे दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमांक-५ मध्ये दर्शविलेल्या वर्षापासून विना अनुदानित/कायम विना अनुदानित तत्वावर नैसर्गिक वाढीने वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूर करण्यात आलेल्या आहेत.सदरील वर्ग/तुकडया खाली दर्शविलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.खालील अटींची पुर्तता होत असल्याची आपण आपल्यास्तरावरुन खात्री करुन सबंधित शाळेस नैसर्गिक वाढीने वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजूर करावेत.

| अ.क्र. | प्राथमिक शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | नैसर्गिक वाढ वर्ष/ तुकडी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.सिध्देश्वर प्राथमिक शाळा,आष्टी ता.परतूर जि.जालना. | मराठी | इ.५ वी पहिली तुकडी | जून २००२ पासून विना अनुदान तत्वावर. |
| २) | मत्सोदरी उर्दु प्राथमिक शाळा,धनसावंगी जि.जालना | उर्दु | इ.५ वी पहिली तुकडी | जून २००७ पासून विना अनुदान तत्वावर. |
| ३) | मत्सोदरी उर्दु प्राथमिक शाळा,कुंभार पिंपळगांव ता.धनसांवगी जि.जालना. | उर्दु | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००७ पासून विना अनुदान तत्वावर |
| ४) | गुलाम नबी गुलाम रसुल उर्दु प्राथमिक शाळा,रेल्वेस्टेशन जालना | उर्दु | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००७ पासून विना अनुदान तत्वावर |
| ५) | मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दु प्राथमिक शाळा,दर्गा दरवाजा जालना. | उर्दु | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००६ पासून विना अनुदान तत्वावर |
| ६) | संत ज्ञानेश्वर प्राथमिक शाळा,शकुंतलानगर,मंठा रोड जालना. | मराठी | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००७ पासून विना अनुदान तत्वावर |
| ७) | श्री.शिवाजी प्राथमिक विद्यामंदीर भोकरदन जि.जालना | मराठी | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००७ पासून विना अनुदान तत्वावर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८) | नूतन प्राथमिक विद्यालय,भोकरदन जि.जालना | मराठी | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००७ पासून विना अनुदान तत्वावर |
| ९) | लोकमान्य प्राथमिक विद्यालय,माळीपूरा जालना | मराठी | इ.३ री ची व इ.४थी ची दुसरी तुकडी | अनुक्रमे जून २००२ व जून २००३ पासून विना अनुदान तत्वावर. |
| १०) | रामचंद्र किनगावकर प्राथमिक शाळा,जालना | मराठी | इ.२ री ची दुसरी तुकडी | **जून २००२ पासून कायम विना अनुदान तत्वावर** |
| ११) | वसंतराव नाईक विद्यामंदीर,मंठा जि.जालना. | मराठी | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००२ पासून विना अनुदान तत्वावर |
| १२) | शांती निकेतन विद्यामंदीर संभाजी नगर,जालना. | मराठी | इ.३ री ची दुसरी<br>इ.४थी ची दुसरी<br>इ.५ वी ची दुसरी<br>इ.६ वी ची दुसरी | **अनुक्रमे जून २००३ जून २००४,जून २००५ व जून २००६ पासून कायम विना अनुदान तत्वावर.** |
| १३) | गोदावरी प्राथमिक शाळा,गोदी ता.अंबड जि.जालना. | मराठी | इ.५ वी प्रथम तुकडी | जून २००८ पासून विना अनुदान तत्वावर |

**अटी:-**

१) नैसर्गिक वाढीच्या तुकडयांचे वाटप करतांना शासन निर्णय दिनांकः-०२/१२/१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्यात यावी.

२) मंजूर करावयाच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग/ तुकडयांची गरज आहे याची खातरजमा करुन त्यानंतरच तुकडया मंजूर करण्यात याव्यात.

३) ज्या शाळांना विना अनुदान तत्वावर (कालांतराने अनुदान तत्वावर येणा-या)परवानगी देण्यात आली आहे.अशा शाळांना मंजूर करण्यात येणा-या नैसर्गिक वाढीच्या वर्गांना/अतिरिक्त नैसर्गिक वाढीच्या तुकडयांना शासन निर्णय क्रमांकः-व्हीएलएस/१०००/(२४५५)/प्राशि-१ दिनांकः-०८/११/२००० मध्ये नमूद केलेले अनुदान सुत्र किंवा प्रत्यक्षात अनुदान मंजूर करतेवेळी जे अनुदान सुत्र लागू होईल तसेच ज्या अतिरिक्त तुकडयांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी दिली आहे त्या शाळांकडून कायम विना अनुदान तत्वावर तुकडी चालवावयास तयार आहे व भविष्यात शासनाकडे अनुदानाची मागणी केली जाणार नाही.असे हमी पत्र घेतल्यानंतरच सबंधित तुकडयांना मंजूरी दयावी.

**शिक्षण उपसंचालक,**
**औरंगाबाद विभाग औरंगाबाद.**

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादरः-**

१) मा.श्री.झं.सा.रणदिवे,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२) मा.शिक्षण संचालक(प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३) सबंधित मुख्याध्यापक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

जा.क्र. जिपजा/शिक्षण/प्रा-6/ 2010
कार्यालय जि. प. जालना
दिनांक :-

प्रती एक प्रत मुख्याध्यापक मत्स्योदरी प्रा. शा. कुंभारपिंपळगाव यांना देऊन सूचित करण्यात येते की, पत्रात नमूद केल्याप्रमाणे अटीच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात यावी.

C:\Documents and Settings\wel come\My Documents\letter-1.doc- 1658